महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२४/अपील/०४/२०२४/0225 दिनांक:०५.०४.२०२४

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २७.०२.२०२४ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | ०५.०३.२०२४ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | १८.०३.२०२४ |
| प्रथम अपील निकाली काडल्याचा दिनांक | : | ०५.०४.२०२४ |

**सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)**

**अपील क्र. ०४/२०२४**

श्री. सदाशिव कोंडीराम शिंदे **... अपीलकर्ता**

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई **... प्रतिवादि**

**आपीलाचे तथ्य:-**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.०२.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २७.०२.२०२४ रोजी प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक २६.०२.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५.०३.२०२४ रोजी चे पत्रांन्वये समाधानकारक माहिती न पुरवल्यामुळे आपीलार्थी यांनी दिनांक १४.०३.२०२४ रोजी त्याच माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले. (अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक १८.०३.२०२४ रोजी प्राप्त झाला).

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक १८.०३.२०२४ रोजी नोटिस पाठवून दिनांक ०४.०४.२०२४ रोजी अर्जा वर सुनावणी आयोजीत केली होती. दिनांक ०४.०४.२०२४ रोजी सुनावणी साठी आपीलार्थी व जन माहिती अधिकारी हजर झाले व त्यांनी सुनावणी दरम्यान मौखिक निवेदन सादर केले.

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in

**अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहे:-**

**मागीतलेली माहिती :**

CTS No. १९७३ जय संतोष माता को. ऑप. हौ. सो. एस.आर.ए. सहकारी संस्था मर्यादित (नियोजित) गोळीबार रोड, सर्वदया हौस. सोसायटीच्या मागे, मुंबई – ४०००८६ येथील पूर्वीच्या झोपड्यांना बी.एस.ई.एस. लिमिटेड या विद्युत पुरवठा उपक्रमाच्या वीज जोडण्या असल्याबाबत माहिती (सोबत एकूण ८४ ग्राहकांची नावे, वीज बिल क्रमांक यांची यादी जोडत आहे.) (सन १९९० ते आजतागायत)

१. CTS No. १९७३- एस.आर.ए. संस्था उपरोक्त गृहनिर्माण संस्थेच्या झो.पु.प्रा. प्रकल्पाच्या संदर्भाने उपरोक्त विषयात नमूद केलेल्या यादीतील ग्राहक/ व्यक्ती यांच्या वीज जोडण्याबाबतचा बी.एस.ई.एस. लिमिटेड कंपनीकडील अभिलेखाची प्रत.
२. सदर यादीतील ज्या व्यक्तीचे वीज जोडणी नाही त्याअनुषंगाने वीज जोडणी नसल्याचा उल्लेख करून माहिती देण्यात यावी.
३. सदरील वीज जोडणी ग्राहकांची वीज जोडणीसाठी सादर केलेली कागदपत्रे व त्यांचा उल्लेख असणारे दस्त उपलब्ध असल्यास त्याच्या प्रमाणित प्रति.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

The requisite information pertains to other utility of Adani Electricity Mumbai Limited.

Adani Electricity Mumbai Ltd. was informed that the Hon'ble Bombay High Court has by its order dated 13.10.2011, interalia stayed the Maharashtra State Information Commission's order dated 14.03.2011 they are not a 'public Authority' as defined under the provisions of Section 2 (h) of the Right to Information Act, 2005 and hence the provisions of the said RTI Act. (Attached Order copy)

Hence, the PIO cannot transfer your application under Section 6 (3) of RTI Act, 2005 to Adani Electricity Mumbai Ltd.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:**

माहिती दिली नाही.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

सदर अपीलामध्ये विचारण्यात आलेली माहिती ही CTS No. १९७३- एस.आर.ए. प्रकल्पाच्या निगडीत बी.एस.ई.एस. लिमिटेड या विद्युत पुरवठा उपक्रमाकडून वीज जोडणीच्या तपशीला बाबत विचारण्यात आलेली आहे. सदर माहिती ही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे.

उपरोक्त माहितीसाठी बी.एस.ई.एस. लिमिटेड कडे व सद्य स्थितीत उपलब्ध माहिती प्रमाणे मे. अदानी ईलेट्रीसीटी मुंबई लिमिटेड या कंपनीशी निगडीत असल्या कारणाने संबंधित कंपनीशी संपर्क व्यवहार करावा.

शिवाय, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी ग्राहकांसाठी त्यांच्या तक्रारी मांडण्यासाठी ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २०२० अंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या मंचा चा उपयोग करावा.

त्यानुसार अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२ येथे अपील दाखल करू शकता.**

## निर्णय

**अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रती,

श्री. सदाशीव कोंडीराम शिंदे
रूम नं. ६१०, बिल्डिंग नं. १/C
जय संतोषी माता को-ऑप हाऊसिंग सोसायटी,
महाडा कॉलनी, शिवाजीनगर,
गोवंडी, मुंबई- ४०००४३.

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रत,

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई